# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

अर्ज क्रमांक १३/२०१६

जा.क्र.जिउनि/साव./कलम१८/शियबों/लायगांव/२२७२/२०१६
औरंगाबाद दिनांक ३० /०४/२०१६

**वाचा :-**

१. श्री. शिवाजी पिता यशवंत बोंगाने (मयत) यांचे वारस बाप्पासाहेब शिवाजी बोंगाने रा. लायगांव यांचा तक्रार अर्ज दिनांक ०७/०८/२०१४
२. श्री. शिवाजी पिता यशवंत बोंगाने (मयत) यांचे वारस बाप्पासाहेब शिवाजी बोंगाने रा. लायगांव यांचे शपथपत्र व अर्ज दिनांक ०६/०२/२०१६
३. श्री. जगन्नाथ बाबुराव बोंगाने, रा. लायगांव ता.जि.औरंगाबाद यांचा तक्रार अर्ज दिनांक २८/०१/२०१४
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिउनि/सावकारी/तक्रार/४५४/२०१४ दिनांक ०६/०२/२०१४
५. तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचा अहवाल दिनांक १७/०४/२०१४
६. श्री. बी.एम.नवथर चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक ०७/०७/२०१४ व २०/११/२०१४
७. श्री. बी.एम.नवथर चौकशी अधिकारी यांचा जमिन ताबा संबंधाने स्थळ पाहणी पंचनामा दिनांक २९.०६.२०१४
८. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये सुनावणी नोटीस जा.क्र. जिउनि/सावकारी/क १८/६९४/२०१६ दिनांक ०९/०२/२०१६

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

श्री. शिवाजी पिता यशवंत बोंगाने (मयत) — अर्जदार
यांचे वारस श्री. बाप्पासाहेब शिवाजी बोंगाने
रा. लायगांव ता. जि. औरंगाबाद

**विरूध्द**

१. श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे — गैरअर्जदार
रा. इंदिरानगर गारखेडा परीसर औरंगाबाद

ज्याअर्थी वाचा क्र.०१ नुसार अर्जदार श्री. बाप्पासाहेब शिवाजी बोंगाने (यापुढे ज्यांच्या उल्लेख अर्जदार असा केलेल आहे.) यांनी गैरअर्जदार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा. इंदिरानगर गारखेडा परीसर औरंगाबाद (यापुढे ज्यांच्या उल्लेख गैरअर्जदार असा केला आहे.) यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या कार्यालयात दाखल केलेली होती. त्या तक्रारीतील मजकुर वाचा क्रमांक २ च्या अर्जातील व शपथपत्रानुसार असल्याने त्याचा उल्लेख पुढे केलेला आहे.

ज्याअर्थी वाचा क्र.०२ नुसार अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार करून दिलेली शेतजमिन परत मिळणे बाबत त्यांनी त्यांचा अर्ज व रु.१००/-च्या प्रतिज्ञापत्रावर शपथपत्र सादर केलेले असुन त्या शपथ पत्रामध्ये असे नमुद केले आहे की, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ व कलम १७ नुसार कार्यवाही करुन सावकाराने अवैध रित्या खरेदी केलेल्या जमिनीचे खरेदीखत अवैध घोषित करुन त्यांची शेतजमिन परत त्यांच्या नावावर मिळणेबाबत शपथपत्रात विषय नमुद करुन सदर शपथपत्रात त्यांनी असे नमुद केले आहे की, ते मौजे लायगाव ता.जि.औरंगाबाद येथील रहिवासी असुन व्यवसायाने शेती करतात त्यांची गट नं.२०९ मध्ये वडीलोपार्जित २० आर जमिन आहे. अर्जदार श्री.बप्पासाहेब शिवाजी बोंगाने यांचे मयत वडिल शिवजी यशवंत बोंगाने यांनी त्यांच्या हयातीमध्ये घरगुती अडचणी मुळे पैशाची गरज पडल्याने त्यांनी सन २००१ मध्ये गैरअर्जदार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे यांच्या कडुन रू. १२०००/- ५ टक्के व्याजाने घेतले होते. या रक्कमेला सुरक्षितता राहावी म्हणुन वरील नमुद २० आर शेतजमिन गैरअर्जदार यांचे नावाने दिनांक १६.०२.२००१ रोजी नोंदणीकृत दस्तऐवज नं.९०४/२००१ व्दारे दुय्यम निबंधक,औरंगाबाद या कार्यालयात खरेदी खत करुन दिले या आधारे रक्कम रू. १२०००/- अशी दाखवुन त्यांच्या हक्कात खरेदीखत करून दिले तसेच अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना वेळो वेळी व्याजाचे पैसे दिले. गैरअर्जदार याना रू. १२०००/- चे एकूण रू. १५००००/- ते रू.२०००००/- अर्जदाराने त्यांना दिले तरीपण गैरअर्जदार सावकार हे अर्जदार यांना जमिनी परत करून देत नाही. म्हणुन अर्जदार यांनी या प्राधिकरणा समोर खरेदीखत रद्द करण्याकरीता रितसर अर्ज व त्याच्या पुष्ठार्थ सदरचे शपथपत्र सादर केलेले आहे. त्या शपथपत्रावर साक्षीदार म्हणुन श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने व श्री. हसन उस्मान पठाण याच्या स्वाक्षऱ्या आहे.

अर्जदार यांनी त्यांचे शपथपत्रासोबत दिलेल्या अर्जामध्ये वरील शपथपत्रामधील माहितीचा तपशिल नमुद करून आनखी असे नमुद केले आहे की, गैरअर्जदार यांना करून दिलेल्या जमिनीच्या दस्तऐवजा मध्ये जरी अर्जदार यांचे वडीलांनी गैरअर्जदार यांना २० आर क्षेत्राचा ताबा दिला असे दर्शविले असले तरी व्यवहार फक्त व्याजाचा असल्याने कर्जाऊ घेतलेल्या रकमेच्या व्याजा बद्दल जमिनीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदार यांना दिला नव्हता अर्थातच त्यांनी हा व्यवहार खरेदीचा नसल्याने प्रत्यक्ष ताबा घेण्याचा प्रश्न उदभवत नाही. सदरची वादातीत मिळकतीवर आजरोजी सुध्दा प्रत्यक्ष अर्जदार यांचा ताबा व कब्जा आहे. अर्जदार यांच्या वडीलांनी घेतलेल्या रू. १२०००/- चे रू. १५००००/- ते रू.२०००००/- साक्षीदारा समक्ष अर्जदार यांच्या वडीलांना दिलेले आहे तरीपण गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या हक्कात वरील मिळकतीचे खरेदीखत करून दिलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दिनांक ०७/०८/२०१४ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद व या कार्यालयात तक्रार अर्ज देऊन गैरअर्जदार यांच्या विरोधात सावकारी कायदया अंतर्गत कार्यवाही करण्यास विनंती केली. तसेच अर्जदार यांची जमिनी परत करण्यात यावी अशी सुध्दा विनंती केली होती. या अर्जानुसार कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने या प्रकरणी पुन्हा अर्जदार

यांनी गैरअर्जदार यांच्या विरोधात कार्यवाही करण्यात यावी या साठी पुन्हा दिनांक ०२/०३/२०१५ रोजी अर्ज सादर केला असल्याचे त्यांच्या अर्जात नमुद आहे.

गैरअर्जदार यांच्या विरोधात वेगवेगळया प्रकरणामध्ये सावकारी कायदया अंतर्गत चौकशी झालेली असून गैरअर्जदार यांचे घराची घरझडती घेतलेली असुन दिनांक ०७/०७/२०१४ रोजी पथक प्रमुख तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ सलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी चौकशी अहवाल उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना सादर केला असुन त्या चौकशी अहवालामध्ये त्यांनी असे स्पष्ट नमुद केले आहे. की, गैरअर्जदार यांच्या घरामधुन एकूण ९ खरेदीखत हस्तगत केले. तसेच दिनांक २०/११/२०१४ रोजी पथक प्रमुख तथा सहकारअधिकारी श्रेणी-१ यांनी दिलेल्या अहवालात असे कळविले की, गैरअर्जदार यांनी अवैध रित्या सावकारी केल्याचे दिसुन येते असे वेगवेगळया प्रकरणात तपासणी अंती म्हटलेले आहे.

अर्जदार यांनी त्याच्या अर्जात असेही नमुद केले आहे की, त्यांचे या पुर्वी उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद व या कार्यालयात दिलेल्या तक्रार अर्जावर गैरअर्जदार यांच्या विरोधात कार्यवाही न केल्या मुळे अर्जदार यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीट औरंगाबाद येथे याचीका क्रमांक ६००/२०१५ दाखल केली होती या याचीकेची सुनावणी दिनांक १५/०१/२०१६ रोजी झाली व सुनावणी अंती मा. उच्च न्यायालयाने याचीकेतील गैरअर्जदार यांना महाराष्ट्र सावकारी (नियमन्) अधिनियम २०१४ नुसार कार्यवाही करण्यात यावी व अवैध सावकारा विरोधात फौजदारी स्वरूपाची सुध्दा कार्यवाही करू शकतात असे आदेश दिलेले आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर केली असल्या बाबत नमुद केलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

१. अर्जदार यांनी दिनांक १६/०२/२००१ रोजी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत सोबत जोडली आहे.
२. अर्जासोबत दिनांक २०/११/२००० रोजी गैरअर्जदार यांच्या हक्कात श्री. जगन्नाथ बाबुराव बोंगाने यांनी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत जोडलेली आहे.
३. दिनांक २३/०५/२००१ रोजी गैरअर्जदार यांच्या हक्कात श्री. एकनाथ बाबुराव बोंगाने यांनी करून दिलेल्या खरेदीखताची प्रत जोडलेली आहे.
४. मा. उच्च न्यायालयाने पारीत केलेले याचीका क्र.६००/२०१५ मधील आदेश अर्जासोबत जोडले आहे.
५. तसेच चौकशी अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सोबत जोडली आहे.

अर्जात नमुद केले आहे की,वरील बाबीचा विचार करता गैरअर्जदार यांनी अवैधरीत्या सावकारी करून अर्जदार व इतर लोकांच्या शेतजमिनी हडप केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्जदार यांचे करून घेतलेले खरेदीखत क्रमांक ९०४/२००१ दिनांक १६/०२/२००१ रद्द करून अवैध असल्याचे घोषीत करण्यास विनंती केली आहे. या अर्जावर साक्षीदार म्हणुन श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने व श्री. हसन उस्मान पठाण यांच्या सहया आहेत.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ३ अन्वये दुसरे मुळ तक्रारदार श्री. जगन्नाथ बाबुराव बोंगाने, रा. लायगांव ता.जि. औरंगाबाद यांनी गैरअर्जदार यांचे विरूध्द अवैध सावकारी संबंधाने दिनांक २८/०१/२०१४ रोजी मा. सहकार मंत्री यांना उद्देशुन तक्रार केल्याने सदर तक्रार विशेष कार्यधिकारी यांनी त्यांचे शेऱ्यासह या कार्यालयाकडे त्वरीत कार्यवाहीस्तव पाठविलेली आहे. सदर तक्रारीत मुळतक्रारदार यांनी असे नमुद केले आहे की,त्यांची लायगाव शिवारात गट नं.२०९ मध्ये जमिन होती. त्यांनी सन २००० मध्ये त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी गैरअर्जदार यांच्याकडे सदर गट नं.मधील ८० आर शेतजमिन रु.६९०००/- मध्ये गहाण ठेवली होती. ते रु.६९०००/- त्यांनी मेहनतीने वर्षाला ५० ते ६० हजार रुपये दिले. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार सावकार यांना रु.४ ते५ लाख रुपये दिलेले आहे. संपुर्ण पैसे व्याजासहीत परत केल्यावर सदरची शेत जमीन त्यांच्या नावावर परत करुन देणे आवश्यक होते.तथापि मुळतक्रारदार यांचे अडाणीपणाचा गैरफायदा घेवुन गैरअर्जदार यांनी ०२ एकर जमीनीपैकी ११ आर जमीन त्यांच्या नावावर परत करुन त्यांची फसवणुक केली आहे. ज्यावेळी सदर फसवणुक त्यांच्या लक्षात आली त्यावेळी त्यांनी मा.जिल्हाधिकारी,मा.तहसिलदार औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केलेली आहे. या तक्रारीनंतर गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबातील इतर सदस्य हे शिवीगाळ करुन त्यांना अपमानीत करीत आहे. मा.तहसिलदार यांनी या शेतजमीनीबाबत त्यांची वहिती लावलेली आहे. ही शेत जमीन त्यांची वडीलोपार्जित असुन आजस्थितीला सदरची जमीन त्यांचे ताब्यात आहे.वरील प्रमाणे माहिती तक्रार अर्जात नमुद करुन त्यांनी न्याय मिळवुन देणेबाबत सदरहु अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

त्यानुसार सदर तक्रारीची चौकशी करण्यासाठी वाचा क्र.४ अन्वये या कार्यालयाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना कळविलेले होते. त्यानुसार त्यानी उक्त तक्रारीची चौकशी त्यांचे कार्यालयातील श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी १ यांचे मार्फत केलेली आहे.संदर्भ क्र.६ नुसार त्यांनी या बाबतचा चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी या तक्रारीची चौकशी श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी केलेली असुन वाचा क्र.६ नुसार त्यांनी त्याचा अहवाल सादर केलेला आहे. त्याचौकशी अहवालात श्री बी.एम.नवथर,सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी असे नमुद केलेले आहे की, मुळतक्रारदार यांचे बेकायदेशीर सावकारी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचे आदेश दिनांक १४.०३.२०१४ नुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ मधील कलम १६ अन्वये अवैध सावकारी संदर्भातील कागदपत्रे हस्तगत करण्यासाठी दिनांक ११.०४.२०१४ रोजी गैरअर्जदार यांचे घराची घरझडती घेणेबाबत कार्यवाही निश्चित करण्यात आली व त्यानुसार पोलिस संरक्षणासह तपासणी पथकासह दिनांक ११.०४.२०१४ रोजी गैरअर्जदार यांचे राहते घराची घरझडती चौकशी अधिकारी यांनी घेतलेली आहे. याबाबत त्यांनी पंचनामा केलेला असुन या पंचनाम्यात नमुद यादी

नुसार त्यांनी गैरअर्जदार यांचे राहते घरातुन पुढील प्रमाणे कागदपत्रे हस्तगत केलेली आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. ऑफिस मुळ संचिका-१

२. वैद्यनाथ बॅंक पासबुक (रविद्र हिरे अकाउंट.नं.१४४०)

३. देवगिरी बॅंक पासबुक (कमलबाई हिरे अकाउंट नं.०८०२/१०/०१/०१०/७८३)

४. फाईल क्र.०१ भाडेकरार नामा (रविंद्र हिरे व अनिल पावर (पान नं.१ ते ४)

५. फाईल क्र ०२ - डिड ऑफ कन्फरमेशन शॉप नं. ४ (शिवशंकर नागरी बॅंक- दिलीप शेळके (पानं.५ ते २२)

६. फाईल क्र.०३ - सातबारा गट नं.२०९/२००१-२००२

७. फाईल क्र.०४ - गावनमुना ७ (पान क्र.२४ ते २७)

८. फाईल क्र.०५ - जमिनीची भरणा पावती (पान क्र२८ ते ३३) (मधुकर गंगाधर टेहरे व कैलास नारायण टेहरे)

९. फाईल क्र.०६ - खरेदी खत (लक्ष्मन भिकजी पारधे व इतर व समशेखा बशिर खॉ)(पान क्र३४ ते ५२)

**१०. फाईल क्र.०७ - पान ५३-१६६ शेती संबंधीत पावत्या(काही मुळ पावत्या व इतर छायांकित ) कार्यालय पत्र व्यवहार,तहसिल ऑफिसपत्र व्यवहार,सातबारे तसेच**

१.खरेदी खत -रविंद्र मोतीराम हिरे ,गंगाधर नामदेव सुरडकर (मु)

२.प्लॉट खरेदीखत -राजु धनाड व विजय दाने (मु)

३.जिरायत जमिनीचे खरेदी खत -जगन्नाथ बोंगाने ,कमलबाई रविंद्र हिरे (मु)

४.प्लॉट खरेदी खत- विजय दानेकर व कार्तिकेयन ईलेमगोवन (मु)

५.जिरायत शेत जमीनीचे खरेदीखत- **कमलबाई हिरे व अंबादास यशवंत बोंगाने (मु)**

६.शेत जमिनीचे खरेदीखत -कमलाबाई व एकनाथ बाबुराव बोंगाने (मु)

७.कोरडवाहु शेत जमिनीचे खरेदी खत -कमलाबाई हिरे व जगन्नाथ बाबुराव बोंगाने (मु)

घरझडतीमध्ये जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रानुसारचा प्राथमिक अहवाल चौकशी अधिकारी यांनी दिनांक ११.०४.२०१४ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना सादर केलेला आहे.

चौकशी अहवालात चौकशी अधिकारी यांनी असे ही नमुद केलेले आहे की, मुळतक्रारदार यांचे तक्रार अर्जानुसार त्यांनी सन २००० मध्ये मुलीच्या लग्नासाठी गैरअर्जदार सावकार श्री कमलबाई रविंद्र हिरे व इतर ०३ यांचे कडुन रु.५% शेकडयाप्रमाणे रु.६९,०००/- व्याजाने घेतले. सदरची रक्कम घेतल्यानंतर मुळतक्रारदार यांनी काही दिवसातच गैरअर्जदार यांना रु.१,८०,०००/- परत केले. मुळतक्रारदार यांना व्याजाची रक्कम देतांना गैरअर्जदार यांनी

मुळतक्रारदार यांचा भोळसर व अडाणीपणाचा फायदा घेवुन गॅरंटीपोटी पैशास धर म्हणुन शेतजमीनीचे खरेदीखत करुन दया असे सांगुन दुय्यम निबंधक,कार्यालयास घेवुन गेले व फक्त इसार पावती करतो असे सांगुन त्यांच्याकडुन कायम खरेदीखत करुन घेतले. ज्यावेळी खरेदीखत करुन दिलेले होते त्यावेळी सदरील जमीनीचा ताबा गैरअर्जदार यांना दिलेला नव्हता तसेच आजतागायत तेच जमीन करात असल्याबाबत या जमिनीवर महसुली दप्तरी ७ब लावण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जापासुन आजतागायत सदरील जमिनीवर त्यांचे महसुली दप्तरी ७ब असुन सदर जमीनीचे प्रत्येक वर्षी पंचनामे होवुन सर्व पंचनामे त्यांच्या हक्कात तहसिल कार्यालयाने घेतलेले आहे. या ७ ब व पंचनाम्याच्या प्रती त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या आहेत. त्यामुळे कायमखरेदी खतानुसार गट नं.२०९ मधील ८० आर जमीन गैरअर्जदार यांची असली तरी शेत जमीनीचा प्रत्यक्ष ताबा ७ ब नुसार मुळतक्रारदार यांचा असल्याचे गावपंचनामा व मा.तहसिलदार यांचा अहवाल दिनांक १०.०६.२०११ वरुन दिसुन येते. तसेच घरझडती पंचानामा कार्यवाही दरम्यान हस्तगत करण्यात आलेले कागदपत्राचे अवलोकन केले असता, सावकारी व्यवसाय करित असल्याबाबत नोंदी किंवा व्याज आकारणी देणे घेणे इत्यादी नमुद असल्याचे कागदपत्र दिसुन येत नाही .परंतु हस्तगत केलेल्या कागदपत्रामध्ये कायम खरेदी खतांच्या नकलांची संख्या (एकुण ०९) पहाता सदर प्रकरणी अवैध सावकारी झाल्याचे नाकारता येत नसल्याचे नमुद आहे.तसेच गैरअर्जदार यांचे राहते घराचे घर झडतीमध्ये हस्तगत केलेले खरेदी खत व इतर कागदपत्रे मुळतक्रारदार यांचा अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रे त्यानुसार उपनिबंधक,सहकारी संस्था ता.औ.बाद कार्यालयात निश्चित केलेली सुनावणी व सदर सुनावणीत उपनिबंधक,कार्यालयात सादर झालेले प्रतिज्ञापत्र पहाता गैरअर्जदार हे बेकायदेशिर सावकारी करित असल्याबाबत प्रथम दर्शनी दिसुन येते

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

चौकशी अहवालानुसार चौकशी अधिकारी यांनी मुळतक्रारदार श्री. जगन्नाथ बाबुराव बोंगाने यांचे अर्जातील मौजे लायगाव ता.औरंगाबाद येथील गट नं.२०९ मधील एकुण क्षेत्राबाबत व प्रत्यक्ष ताबा /वहिती याबाबत भेट देवुन त्यांनी ताबा /वहिती पंचनामा करणेबाबत निश्चित केले त्यानुसार २९.०६.२०१४ रोजी मौजे लायगाव ता.औरंगाबाद येथे भेट देवुन प्रत्यक्ष पहाणी व पंचनामा केला त्यानुसार गट नं.२०९ मधील सदरील जमीन मुळतक्रारदार यांचे ताब्यात असल्याचे निदर्शनास आल्याबाबत पंचनाम्यात नमुद आहे,या बाबतच्या पंचनाम्यावर आजुबाजुचे स्थानिक रहिवाशी ,शेजारी व तपासणी पथकातील सदस्यासह एकुण ०१ ते २६ व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्या पंचनाम्यात असे नमुद आहे की, मौजे लायगाव ता.औ.बाद येथील गट नं २०९ मध्ये एकुण एकुण क्षेत्रापैकी तक्रार अर्जातील क्षेत्र ८० आर जमीन तसेच सदर गट नं.मधील एकुण क्षेत्र १.४५ आर जमीन मुळतक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिन असुन सन १९९९ मध्ये मुळतक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना खरेदी खत करुन दिले परंतु सदरील शेतजमिन मुळतक्रारदार यांचे ताब्यात वहितीस आहे.तसेच मशागतीचे कामे मुळतक्रारदार हेच करतात असे उपस्थित पंचांनी सांगितलेले आहे. तसेच या जमिनीबाबत तंटामुक्ती ,गावसमिती लायगाव यांनीही यापुर्वी मुळतक्रारदार यांची ही वडीलोपार्जित शेत जमिन तेच वहिती करित असल्याबाबत पंचनामा केलेला आहे. तो यापुर्वीच्या तक्रार अर्जाला

जोडलेला आहे.त्याबाबत पंचनाम्याच्या वेळी उपस्थित शेतकरी यांच्याकडे चौकशी अधिकारी यांनी चौकशी केली असता ,सर्वांनी या शेतजमिनीवर मुळतक्रारदार यांचा ताबा वहिती असल्याबाबत स्पष्टपणे सांगितले तरोच या बाबत दिनांक १०.०६.२०११ रोजी तत्कालीन नायब तहसिलदार यांचा अहवाल व पंचनामा दिनांक ०५.०५.२०११ दाखविला असता त्यानुसार या शेतजमिनीवर मुळतक्रारदार यांचा ताबा व वहिती आहे असे स्पष्ट सर्व उपस्थित पंचांनी सांगितलेले आहे,अशी वरीलप्रमाणे जमिनिच्या प्रत्यक्ष ताब्याबाबत माहिती पंचनाम्यात नमुद आहे.

ज्या अर्थी वाचा क्र.२ नुसार अर्जदार यांचा अर्ज व शपथपत्र प्राप्त झाल्याने या कार्यालयाने वाचा क्रमांक ८ नुसार सुनावणी नोटीस निर्गमित करून या प्रकरणी प्रथम सुनावणी दिनांक १७/०२/२०१६ रोजी ठेवण्यात आलेली होती. या सुनावणीस अर्जदार यांचे सह त्यांचे वतीने ॲड एम.एस.कराड च्या वतीने ॲड एस.व्ही.जाधवर उपस्थितीत झाले तसेच गैरअर्जदार यांचे वतीने ॲड प्रमोद कुळकर्णी यांनी वकील पत्र सादर करून सांगितले की, सदर दाव्यातील नोटीस मिळाली असून दाव्याची प्रत मिळालेली नाही. ती मिळण्यास विनंती केली. त्यानुसार गैरअर्जदार यांचे वकील यांना दाव्याची प्रत देण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक २६/०२/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०२/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार श्री. बाप्पासाहेब शिवाजी बोगाने हजर गैरअर्जदार श्रीमती कमलबाई हिरे यांच्या मार्फत ॲड प्रमोद कुळकर्णी यांनी हजर होऊन दिनांक २६/०२/२०१६ नमुद करुन आक्षेप आर्ज सादर केला. त्याची प्रत अर्जदार यांना देण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक ०१/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार उपस्थितीत अर्जदार यांचे वतीने सदर आक्षेपावर लेखी म्हणने मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार यांच्या वतीने त्यांचे वकील उपस्थितीत गैरअर्जदार यांचे वतीने ॲड प्रमोद कुळकणी उपस्थितीत अर्जदार व गैरअर्जदार यांनी युक्तीवाद केला की, दावा क्रमांक ११/२०१६ मध्ये जो युक्तीवाद दोन्ही पक्षांनी केला आहे तोच युक्तीवाद सदरील प्रकरणात अवलंबण्यात यावा. आक्षेपा नुसार अधिकार कक्षेच्या मुद्दा बाबत निर्णयास्तव पुढील सुनावणी दिनांक १०/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदार यांच्या वतीने त्यांचे वकील यांनी दाखल केलेल्या आक्षेप अर्जावर दावा क्रमांक ११/२०१६ मध्ये लेखी म्हणने दाखल केले त्याची प्रत गैरअर्जदार यांना देण्यात आली. या सुनावणीच्या वेळी गैरअर्जदार यांचे वकील यांनी म्हणने मांडले की, मुळ तक्रारदार यांच्या प्रकरणात दिनांक ११/०४/२०१४ रोजी घरझडती पंचनाम्यात आक्षेपार्ह काहीही आढळुन आलेले नाही. दिनांक ३१/०७/२०१४ रोजी ता. उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी या कार्यालयास माहिती पाठवुन त्यात १ ते १६५ पाणे असून श्री. अरूण पवार शपथपत्राबाबत उपस्थितीत नाहीत. दिनांक ०६/११/२०१२ पुर्वीचा निकाल दिलेला नाही. गैरअर्जदाराच्या घरझडतीत जप्त केलेल्या कागदपत्रावरून सावकारी

व्यवहाराचे आक्षेपार्ह कागदपत्रे आढळुन आलेले नाही. अर्जदाराचे ७ ब निकाल फेटाळुन लावलेले आहे. मुळ तक्रारदार यांच्या नावाचे पंचनामे फेटाळणे व अर्ज निकाली दिनांक २९/१०/२०१२ पिक पेरा फेटाळणे बाबत मा. तहसिलदार यांचे आदेश तलाठी व मुळ तक्रारदार यांचे विरूध्द ४२० व ४६८ अंतर्गत वैयक्तीक फौजदारी दावा दाखल आहे. सबब सदर प्रस्तुत दावा अधिकार कक्षे बाहेर असल्यामुळे फेटाळण्यात यावा यावर अर्जदाराचे वकील यांनी पुढील प्रमाणे युक्तीवाद केला. पान क्र.३६ अर्जदाराचे प्रस्तुत सादर केलेल्या दाव्यात पुरावा जोडलेला आहे. सदर प्रकरणी प्रथक प्रमुख यांनी दिनांक २०/११/२०१४ रोजी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यात सावकारी केल्याचे स्पष्ट दिसुन येते असे नमुद आहे. पान क्र.२ दाव्यातील कागदपत्रात स्पष्ट नमुद आहे. अर्जदाराचाच वादातील मिळकतीवर ताबा आहे. त्यांनी कर्जाऊ घेतलेली रक्कम व्याजासह परत फेड केली आहे. तरीपण गैरअर्जदार यांनी ठरल्या प्रमाणे गहाण खत जमिन रजिष्ट्रीने परत केली नाही. अर्जदाराने दिनांक ०७/०८/२०१४ व त्यापुर्वी दिनांक ११/०६/२०१४ रोजी तक्रार देऊन रजिष्ट्री परतीची मागणी केली आहे. दिनांक १३/०४/२०१५ रोजी या कार्यालयाने तक्रार तालुका उपनिबंधक यांना चौकशीस्तव दिलेली आहे. तथापी तक्रारीवर कार्यवाही नाही म्हणुन याचीका क्रमांक ६००/२०१५ दाखल केली. सुनावणी अंती दिनांक १५/०१/२०१६ रोजी त्यावर मा. उच्च न्यायालयात निर्णय होऊन सक्षम अधिकाऱ्यास कार्यवाही करण्याचे व फौजदारी कार्यवाही सुध्दा करू शकता अशे आदेश पारीत केलेले आहे. यावर गैरअर्जदार यांचे वकील यांनी प्रतियुक्तीवाद केला की, मा. उच्च न्यायालयात याचीका क्रमांक ९१७/२०१५ गैरअर्जदार यांनी दाखल केली होती. त्यात मागणी केली होती की, सावकारीची कार्यवाही थाबवावी यावर मा. उच्च न्यायालयाने असे म्हणने मांडले की, कार्यवाही झाल्यास योग्यत्या अधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. सदर आदेश हे याचीका क्र.६००/२०१५, याचीका क्र. २२२/२०१५ व याचीका क्र.९१७/२०१५ हे एकत्रीत निकाली काढले आहे.

अर्जदार यांचे वतीने दावा क्रमांक ११/२०१६ मध्ये असे लेखी म्हणने मांडले आहे की, अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार खरेदीखत रद्द करण्या बाबत दिलेला आहे. तो प्रलंबीत आहे. या तक्रारीवर गैरअर्जदार यांनी अर्ज सादर केलेला असून त्यात असे नमुद केले आहे की, सदरील तक्रार अर्ज मेंन्टेनेबल नाही. या बाबत चौकशी झालेली असून घरझडती मध्ये गैरअर्जदार यांचे घरी काहीही आक्षेपार्ह आढळुन आलेले नाही. त्यानुसार या कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे. म्हणुन सदरचा अर्ज हा मेन्टेंनेबल नाही. चौकशी अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात स्पष्ट पणे नमुद केले आहे की, गैरअर्जदार हे बेकायदेशीर सावकारी करीत असल्या बाबत शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार यांनी या कार्यालयाकडे व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचेकडे अवैध सावकारी संबंधाने व त्यांनी गैरअर्जदार यांचेकडुन घेतलेले पैसे व्याजासहीत परत केलेले असुनही गैरअर्जदार हे शेतजमिनीचे खरेदीखत परत पलटवुन देत नाही. यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने अर्जदार यांनी फौजदारी याचीका क्रमांक ६००/२०१५ मा. उच्च न्यायालयात दाखल

केलेली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५/०१/२०१६ रोजी निर्णय दिलेला असून त्या निर्णयात असे आदेश केले आहे की, अर्जदार यांच्या आर्जावर निर्णय घेण्यात यावा आवश्यकता असल्यास फौजदारी कार्यवाही करावी. असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले असल्याने सदर प्रकरणी हे मेन्टेनेबल आहे.

सबब अधिकार कक्षेच्या मुद्दा बाबत निर्णयास्तव राखीव ठेवुन पुढील सुनावणी दिनांक १०/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदाराच्या वतीने ॲड एम.एस.कराड उपस्थितीत तसेच गैरअर्जदार व त्यांचे वकील गैरहजर गैरअर्जदार यांचे वतीने त्यांचा मुलगा विलास हीरे हजर होऊन लेखी विनंती अर्ज सादर करून पुढील तारीख देणे बाबत विनंती केल्याने या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १७/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

दिनांक १७/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे वकील उपस्थितीत गैरअर्जदार यांना दिनांक २६/०२/२०१६ रोजीच्या दिलेल्या आक्षेप अर्जावर घेतलेल्या दिनांक १५/०३/२०१६ च्या निर्णयाची प्रत देण्यात आली.

सदर निर्णय पुढील प्रमाणे आहे. ज्या अर्थी, अर्जदार यानी या प्राधिकरणा समोर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ व कलम १७ नुसार कार्यवाही करून अवैधरित्या सावकाराने सावकारीत घेतलेल्या जमीनीचे खरेदीखत अवैध घोषीत करून त्यांची लायगाव येथील गट न.२०९ मधील दाव्यातील नमुद जमीन परत मिळणे बाबत दावा क्र. १३/२०१६, अन्वये वरील अर्जदारांनी प्रकरण दाखल केलेले आहे.

ज्या अर्थी, अर्जदार यांनी त्यांचा अर्ज व शपथपत्र दाखल केल्याने उपरोक्त प्रकरणी प्रथम सुनावणी दि.१७.०२.२०१६ रोजी ठेवण्यात आली. तद्नंतर या प्रकरणी दि.२६.२.२०१६, ०१.०३.२०१६, ०५.०३.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.०५.०३.२०१६ रोजीच्या सुनावणी वेळी गैरअर्जदार यांचे अभियोक्ते श्री.प्रमोद कुलकर्णी यांनी असे प्रतिपादन केले की, अर्जदार यांचे प्रकरणात घरझडती दिनांक ११.०४.२०१४ रोजी घेण्यात आलेली आहे. त्या पंचनाम्यात आक्षेपार्य काही आढळून आलेले नाही. अर्जदार यांचे ७ ब पिक पेरा बाबतचे प्रकरण तहसिलदार यांनी फेटाळलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरण अधिकार कक्षेबाहेरील असल्यामुळे फेटाळण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

अर्जदार यांचे अभियोक्ते श्री एम एस कराड यांनी दि.५.३.२०१६ रोजीच्या सुनावणीचे वेळी असे प्रतिपादन केले की, अर्जदार यांनी सदर दाव्यात पुरावा जोडला आहे.तसेच या प्राधीकरणा समोर दावा क्र.१०/२०१६ चालु असलेल्या प्रकरणात प्राधीकृत अधिकारी यांनी घेतलेल्या घरझडती व दिलेल्या चौकशी अहवालात सदर प्रकरणात स्पष्ट नमूद केले आहे की, गैरअर्जदार हे अवैध रित्या सावकारी करीत असल्याचे सिध्द होते, त्यामूळे सदर प्रकरणी सावकारी व्यवहार झाला नाही असे म्हणता येणार नाही.तसेच प्रथक प्रमुख यांचे दि.२०.११.२०१४ च्या अहवालात

सावकारी असल्याचे स्पष्ट नमुद केले आहे. अर्जदार यांचा मिळकतीवर ताबा आहे. अर्जदार यांनी कर्जाऊ घेतलेली रक्कम सहव्याज परतफेड केलेली आहे. तथापि गैरअर्जदार यांनी ठरल्या प्रमाणे गहाण खत रजिस्ट्री परत पलटवून दिलेली नाही.

ज्या अर्थी,या प्रकरणी अर्जदार व गैरअर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे फौजदारी याचिका क्र.६००/२०१५,९१७/२०१५ व याचिका २२२/२०१५ दाखल केलेली होती. या दोन्ही याचिकेची एकत्रित सुनावणी होऊन त्यामध्ये दिनांक १५.०१.२०१६ रोजी निर्णय देण्यात आलेला आहे. ह्या याचिकेत अर्जदार यांनी नमुद केले होते की, त्यांचे तक्रारी नुसार संबंधीत प्राधिकारी यांनी कार्यवाही सुरु केली आहे. तथापि या प्रकरणी पूर्ण प्रक्रिया अंवलंबली नाही. त्या नुसार मा.उच्च न्यायालयाने दि.१५.०१.२०१६ रोजीचे आदेशात नमुद केले आहेत की, संबंधीत प्राधिकारी यांनी या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलमा नुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. आवश्यकता असल्यास या प्रकरणी अवैध सावकारी अंतर्गत तक्रार ही नोंदवावी. गैरअर्जदार यांनी त्यांचे विरुध्द सुरु असलेली कार्यवाही थांबविणे बाबत मा.उच्च न्यायालयात फौजदारी याचिका क्र.२२२/२०१५ दाखल केलेली होती. त्यामध्ये मा.न्यायालयाने अर्जदार यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने याचिकेत हस्तक्षेप केलेला नाही. व आदेशीत केले की, या प्रकरणी गैरअर्जदार यांचे विरुध्द कार्यवाही झाल्यास योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागावी असे आदेश देऊन अर्जदार व गैरअर्जदार यांची याचिका निकाली काढली आहे.

गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांनी विनंती केली आहे की, सदर प्रकरण अधिकार कक्षे बाहेरील असल्यामुळे फेटाळण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य सहकारी पतपुरवठयात देशात आघाडीवर असून या संरचनेव्दारे शेतक-यांची आर्थिक गरज भागविण्यात येते.तरी देखील काही अपरिहार्य कारणास्तव काही शेतकरी /शेतमजूरांना सावकाराकडुन कर्ज घेण्याची गरज भासते,अशा परिस्थतीत सावकाराकडुन शेतक-यांची पिवळणूक होऊ नये म्हणुन राज्यात सावकारी व्यवसायाचे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ नुसार नियमन करण्यात येत होते.मात्र या कायद्यातील तरतुदी पुरेशा व प्रभावी ठरत नसल्यामुळे सावकाराकडुन शेतक-यांची होणारी पिवळणुक नियंत्रित करणे अडचणीचे होत होते.सावकाराने अवैधरित्या कर्जदार शेतक-यांची मालमत्ता हडप करणे,कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारले जाणे यावर पुरेसे निर्बध आणता येत नव्हते.सावकारीतील गैरप्रकार उघडकिस आल्यास या अपराधापोटी लावली जाणारी शिक्षा अथवा दंड याबाबतची तरतुद सावकारांवर जरब बसण्यइतपत पुरेशी नव्हती. **आणि सावकारी खाली गहाण असलेली जमिन परत करण्याची सदर कायद्यात तरतुद नव्हती** म्हणजेच जूना मुंबई सावकारी कायदा हा अपूरा पडू लागला.परिणामी, सावकारीवरील विद्यमान अधिनियम हा,कर्जदार शेतक-यांचे सरंक्षण करण्यास आणि सावकाराकडुन होणा-या पिळदणुकीस प्रतिबंध करण्यास अपर्याप्त असल्याचे दिसून आले होते,अशा परिस्थितीत,सावकारांकडुन होणा-या कर्जदार शेतक-यांच्या पिळवणुकीस प्रभावी रीतीने प्रतिबंध

करण्यासाठी समुचीत व कठोर समाजीक आणि कायदेशिर उपाययोजना करणे शासनास अत्यावश्यक झाले होते.त्यामूळे कडक निर्बध असलेल्या आणि शेतक-यांची सावकाराकडील जमिन परत करणेस सक्षम सुधारीत असा कायदा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश २०१४ हा नविन सुधारीत कायदा दिनांक १६.१.२०१४ पासुन राज्यात लागु करण्यात आला.

सदर कायद्याचा प्रचार प्रसाराकरीता शासनाच्या दिनांक २० जानेवारी २०१४ सुचना नुसार २६ जानेवारी २०१४ या राष्ट्रीय दिनांचे औचित्य साधुन ग्रामपंचायतीच्या स्तरावर होणा-या ग्रामसभेमध्ये सहकार विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या पुस्तीकेचे ग्रामसेवक,तलाठी,सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत वाचन करण्यात येऊन सदर नविन कायद्याची मोठया प्रमाणात प्रसिध्दी देऊन व्यापक जनजागृती,करण्यात आली.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ मधील तरतुदी नुसार (१) कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे किंवा कर्जदाराचे अर्जा वरून अन्य रितीने जर ह्या पडताळणीच्या किंवा तपासणीच्या दिनांका पासून अथवा कर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांका पासून १५ वर्षाच्या आत विक्री, गहाण, भाडेपट्टा विनियमन या रुपाने किंवा अन्य रुपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल सावकाराला प्रतिभूती म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या स्वरुपाचे आहे. असे जिल्हा निबंधकास सहकारण वाटत असेल तर त्या जिल्हा निबंधकास स्वतः किंवा त्या प्रयोजनासाठी विहित रितीने नियुक्त करण्यांत येईल. अशा चौकशी अधिकाऱ्या मार्फत या व्यवहाराच्या स्वरुपाची आणखी चौकशी करण्यात येईल अशी तरतुद उक्त अधिनियमात करण्यांत आलेली आहे. आणि

उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदार यांचे प्रकरणात सुनावणी / चौकशी सुरु करण्यांत आलेली आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी सुनावणीचे वेळी असे प्रतिपादन केले आहे की, सदर प्रकरण अधिकार कक्षे बाहेरील असल्यामुळे ते फेटाळण्यात यावे. या म्हणण्यास पृष्ठी देता येत नाही. म्हणून कारण गैरअर्जदारांचे विरुध्द यापुर्वी श्री.जगन्नाथ बाबुराव बोंगाने यांचे दिनांक २८/०१/२०१४ रोजीचे सावकारीचे तक्रारी संबंधाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था औरंगाबाद यांना चौकशी करुन अहवाल सादर करणे बाबत कळविले नुसार त्यांचे कार्यालयाचे सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी दिनांं ११/४/२०१४ रोजी गैरअर्जदारांचे घरझडती व प्रत्यक्ष श्पेतजमिनीचे भेटी पंचनाम्यानंतर दिनांक २०/११/२०१४ रोजीचे सादर चौकशी अहवालात गैरअर्जदारांची सावकारी संशय संबंधाने स्पष्ट नमुद आहे.म्हणून या प्रकरणी गैरअर्जदार यांचे (Not tenable)आक्षेप अर्ज दिनांक २६/०२/२०१६ चा फेटाळला आहे.

उपरोक्त निर्णय गैरअर्जदार,अर्जदार यांना दुऊन पुढील सुनावणी दिनांक २१/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली. या सुनावणीस अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे वकील उपस्थितीत अर्जदार यांचे वकील एम.एस.कराड यांना मा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुनावणीचे कामकाज असल्याने सदरची सुनावणी दिनांक २३/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे वकील उपस्थितीत तसेच गैरअर्जदार यांनी सदरील प्रकरणात तक्रार अर्जावर लेखी म्हणने सादर केले. त्या लेखी म्हणन्यात गैरअर्जदार यांचे वकील यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी तक्रारीत नमुद केलेले सर्व मुद्दे नाकारण्यात येत आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील व्यवहार हा जमिन हस्तंतरण कायदा १८८२ नुसार झालेला आहे. याचीका क्रमांक २२२/२०१५ मधील श्री. जगन्नाथ हे श्री. एकनाथ यांचे सख्खे भाऊ आहे. इतर दोन हे चुलत भाऊ आहे. या सर्वांनी मिळुन गैरअर्जदार यांची मालमत्ता हडप करण्यासाठी नियोजन केलेले आहे. जी मालमत्ता गैरअर्जदार यांनी खरेदीखता द्वारे खरेदी केलेली आहे. अर्जदार यांनी खरेदीखता नुसार गट नंबर २०९ मधील नमुद शेतजमिनीचा ताबा गैरअर्जदार यांना दिलेला असून खरेदीखता नुसार महसुल अभिलेखात तलाठी यांनी गैरअर्जदार यांचे नावे ७/१२ उताऱ्यावर घेतलेले आहे. तलाठी यांनी प्रत्यक्ष जमिनी कोणाच्या ताब्यात आहे या बाबत भेट देऊन नोंद घेतलेली आहे. त्यानुसार सन २००० -२००१ पासुन गैरअर्जदार यांचे नाव ७/१२ उताऱ्यात मालकी हक्कात व वहीती रकान्यात आहे. गैरअर्जदार यांनी या जमिनीमध्ये विहीरीचे खोदकाम केलेले असून त्या बाबतची नोद ७/१२ उताऱ्या केलेली आहे.तलाठी व अर्जदार यांनी संगणमताने ७/१२ उताऱ्यात बदल केल्याने त्यांच्या विरूध्द भारतीय दंडविधान कायदयाचे कलम ४२० व इतर कलमा नुसार तक्रार गैरअर्जदार यांनी दाखल केलेली आहे. गैरअर्जदार हे मागासवर्गीय असल्याने त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने अर्जदार यांनी खोटया तक्रारी दाखल केलेल्या आहे. गावकऱ्यांना सांगितले आहे की, या जमिनीमध्ये मशागत करू नये जर केल्यास गावाकरी ही त्याच्या विरोधात जातील. गैरअर्जदार हे सदर जमिनीचे कायदेशीर खरेदीदार असून अर्जदार हे जमिन हडपन्याच्या दृष्टीने वेगवेगळया युक्त्या वापरत आहे. अर्जदार यांच्या तक्रारीनुसार गैरअर्जदार यांचे राहते घरी दिनांक ११/०४/२०१४ रोजी घरझडती घेण्यात आली असून या घरझडती पंचनाम्यानुसार गैरअर्जदार यांच्या घरी अवैध सावकारी बाबत आक्षेपार्ह बाबी सापडलेल्या नाही. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी या कार्यालयाकडे अहवाल दिनांक ३१/०७/२०१४ रोजी सादर केला असून त्या मध्ये गैरअर्जदार यांच्या घरी घरझडतीत हस्तगत केलेल्या कागदपत्रामध्ये अवैध सावकारी बाबत आढळून आलेले नाही, असे नमुद केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची तक्रार खर्चासह निकाली काढावी अशी विनंती सदर लेखी म्हणन्यात केलेली आहे. यावर पुढील सुनावणी दिनांक ३१/०३/२०१६ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०३/२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे वकील हजर तसेच पुढील वृत्तांत सुनावणी दरम्यान घडलेल्या घटनेमुळे केलेल्या पंचनाम्याप्रमाणे आहे. त्या पंचनाम्याची माहिती खालील प्रमाणे

**पंचनामा :-** सुनावणी दरम्यान दिनांक ३१.०३.२०१६ रोजी या कार्यालयात अर्जदार विरुध्द गैरअर्जदार यांचे सावकारी प्रकरणात या कार्यालयाचे दालनात सुनावणी सुरु होती. सुनावणी दरम्यान सायंकाळी १७.३० वाजता असे निदर्शनास आले की, गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद रविंद्र हिरे हे त्यांच्या ॲपल कंपनीच्या मोबाईल मध्ये गोपनिय रित्या रेकॉर्डीग करित असल्याचे निदर्शनास आले आहे. हया वेळी गैरअर्जदार यांचे वकील अर्जदार यांचा उलट तपास घेत होते. त्यामधील एका प्रश्नावर अर्जदार भावनाविवश होवुन याच वकिल साहेबांनी (ॲड कुलकर्णी) यापुर्वीही त्यांना न्यायालयाच्या सुनावणी प्रकरणाच्या वेळी आणि तालुका उपनिबंधक,यांच्याकडील सुनावणीच्या वेळी ते बसलेल्या गाडीमध्ये त्यांना अडविलेले आहे. धाक धपटशा केला आहे. याबाबत क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे त्यांनी अर्ज दिलेला आहे. असे जोराने बोलत होते.त्यावेळी गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद रविंद्र हिरे वय २७ वर्ष, शिक्षण एम कॉम, हे मोबाईल मध्ये सुनवाणी सुरु असल्याची व्हीडीओ रेकॉर्डीग करित होते. यावरुन हे लक्षात येते की, सदर तक्रार २०१४ पासुन सुरु असुन यापुर्वीही सन २०११ मध्ये तक्रार झाली होती तेव्हाही ॲड श्री कुलकर्णी हेच गैरअर्जदार यांचे वकील होते यावरुन असे दिसुन येते की, अर्जदार भावना विवश होवुन/चिडुन खवळावे असे प्रश्न व चिडल्यानंतर त्यांची व्हिडीओ रेकॅर्डीग करावी असे विचारपुर्वक नियाजन होते .त्यामुळे सदर प्रकरण यामधील अर्ज ,झालेली झडती,यापुर्वीची चौकशी ,याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल दावे अनेक अर्जदार यांच्या गैरअर्जदार यांच्या संदर्भात आलेल्या तक्रारी,त्यांचे शपथपत्रातील जवाब प्राधिकृत अधिकारी यांचा अहवाल ,इत्यादी आढळुन आलेल्या बाबी यासर्व बाबी /पुरावे हे गैरअर्जादाराच्या विरुध्द जात असल्याचे गैरअर्जदाराच्या लक्षात आल्यामुळे या प्राधिकरणाला प्रस्तुत दाव्यात निर्णय घेता येवु नये म्हणुन ही सर्व उठाठेव गैरअर्जदार क्र.१ यांनी केलेली आहे. म्हणुन प्रस्तुत प्रकरण तसेच प्रस्तुत गैरअर्जदार यांच्या विरुध्द या प्राधिकरणासमोर दावा क्र.११/२०१६ श्री अंबादास यशवंत बोंगाणे विरुध्द श्रीमती कमलबाई हिरे, दावा क्र.१२/२०१६ श्री एकनाथ बापुराव बोंगाणे ,दावा क्र.१३/२०१६ श्री शिवाजी यशवंत बोंगाणे (मयत) यांचे वारस श्री बाबासाहेब शिवाजी बोंगाणे इत्यादी दाव्यामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचे लेखी म्हणने प्राप्त झालेले आहे.सावकारी संबधाच्या मुळ तक्रारीवर चौकशीही झालेली आहे.त्यामुळे प्रस्तुत दावा क्र.१०/२०१६,११/२०१६,१२/२०१६ व १३/२०१६ उपलब्ध कागदपत्राच्या आधारे निर्णय घेण्याकरिता सदर सर्व चार प्रकरणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सदर नमुद मोबाईलमधील रेकॉंर्डीग गैरअर्जदार यांचा मुलगा श्री रविंद्र हिरे यांच्याकडुन सदर मोबाईलचा कोड (पासवर्ड) घेवुन उघडण्यात आला व रेकॅर्डीग पाहिली असता रेकॅर्डीगचा फोकस अर्जदार यांच्या वर असुन ते चिडल्यावरचे रेकॉर्डीग केले आहे. सदर रेकॉडींग अर्जदार व गैरअर्जदार यांचे वकील यांनाही दाखविण्यात आले. यावर गैरअर्जदार यांचे वकील ॲड श्री कुलकर्णी यांनी नमुद केले की, अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.०१ याचे वकील म्हणजेच त्यांच्यावर केलेले आरोप खोटे आहेत.गैरअर्जदार यांनी देखील अर्जदाराच्या वकीलावर त्यांच्याकडे आक्षेपार्ह वागणुकीबाबत खाजगीत बोललेले आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांचे वैयक्तीक न्यायालयीन प्रकरण आहे त्यामुळे अर्जदार गैरअर्जदार यांच्या

वकीलांचा वैयक्तीक बाबीशी काहीही संबंध नाही. गैरअर्जदार क्र ०१ यांचा मुलगा श्री विनोद हिरे यांनी भ्रमण यंत्राव्दारे चलचित्रफित (व्हिडिओ)हि केवळ अर्जदाराच्या बाबत होती .त्यामुळे सदरील चुक ही गैरअर्जदार क्र.०१ यांच्या मुलाच्या लक्षात आली असुन ती मान्य करुन मा.न्यायालयाची माफी मागीतली त्यांचा मोबाईल परत करण्याची विनंती केली . यावर अर्जदाराचे वकील ॲड एम.एस.कराड यांनी नमुद केले की, प्रस्तुत प्राधिकरणासमोर वकीलपत्र दाखल करुन हजर झालेलो आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांचे वकीलाचे म्हणणे तथ्यहिन आहे. यावर अर्जदार /गैरअर्जदार व प्रस्तुत गैरअर्जदाराच्या विरुध्दचे दावे क्र.१०/२०१६,११/२०१६,१२/२०१६,व १३/२०१६ उपलब्ध लेखी पत्राव्दारे सर्व निर्णय घेवुन निकाली काढण्याचे प्राधिकरणाने निश्चित केले तसेच गैरअर्जदार यांचा मुलगा श्री विनोद हिरे यांचा मोबाईल मधील चित्रफित इतर मोबाईलमध्ये कॉपी करुन त्यांच्या मोबाईलमधील चित्रफित डिलीट करुन त्यांचा मोबाईल परत करण्यात आला. व सदर प्रकरणाची पार्श्वभुमी मागील ०८-१० वर्षापासुन प्रस्तुत दावा आणि त्यामुळे अर्जदाराचा सुटलेला संयम आणि गैरअर्जदाराच्या मुलाचे वय शिक्षण व भवितव्याचा विचार करुन सदर प्रकरणी त्यांना समज देवुन दावे निर्णयास्तव बंद करण्यात आले.

REGISTRAR OF MONEYLENDERS, AURANGABAD * DIST. AURANGABAD *

उपरोक्त प्रमाणे अर्जदार यांचा अर्ज त्यावर त्यांचे वकीलाचे म्हणणे ,गैरअर्जदार व त्यांचे वकिल यांचे म्हणणे, चौकशी अधिकारी यांचा अहवाल,सुनावणी दरम्यान प्राप्त पुरावे व सहपत्रे यानुसार अर्जदार यांचे प्रकरणात पुढील मुद्दे निश्चित करण्यात आले, या मुद्यानुसार याबाबत सखोल सुनावणीअंतीचे निम्नस्वाक्षरीत यांचे मत खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | सुनावणीमध्ये निश्चित केलेल मद्दे | त्यावर निम्नस्वाक्षरीत यांचे मत |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २० आर जमिन गैरअर्जदार यांना सावकारी व्यवहारा पोटी खरेदीखताद्वारे गहाण म्हणुन दिली आहे काय? | होकारार्थी |
| २ | प्रस्तुत प्रकरण हे सावकारी कायदयाच्या कलम १७ व १८ अंतर्गत चालविण्या योग्य आहे काय? | होकारार्थी |
| ३ | मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर होकारार्थी असल्यास या बाबत अर्जदार यांची तक्रार अर्जात नमुद शेतजमिन महाराष्ट्र सावकरी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(२) नुसार अर्जदार यांना परत करणे योग्य आहे काय ? | होकारार्थी |

याबाबतचे निश्चित झालेल्या मुद्याचे उत्तर होकारार्थी दिलेले असल्याने त्याबाबतचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

सुनावणी अंती, प्राप्त पुरावे, अर्जदार गैरअर्जदार यांचे म्हणणे विचारात घेता मुद्दा क्र.०१ नुसार सदर व्यवहार हा सावकारी पोटी जमिन खरेदी खत गहाण आहे काय ? याबाबत यामुद्याचे उत्तर होकारर्थी दिलेले आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जावर त्यांचे व्यवहारातील मध्यस्ती साक्षीदार म्हणुन

१. श्री. जगन्नाथ बाबुराव बोंगाने रा.लायगाव ता.जि. औ.बाद

२. श्री हसन उस्मान पठाण रा.लायगाव ता.जि. औ.बाद

यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहे. त्यांच्या म्हणण्या नुसार अर्जदार व गैरअर्जदार सावकार श्रीमती. कमलबाई रविंद्र हिरे यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. अर्जदार यांचे वडील श्री. शिवाजी पिता यशवंता बोगाने मयत यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २० आर जमिन त्यांचे त्यांच्या हयातीच्या काळात घरगुती अडचणी मुळे त्यांना पैशाची अडचन पडल्यामुळे सन २००१ मध्ये गैरअर्जदार यांच्याकडुन रू.१२०००/- शेकडा ५ टक्के व्याजाने घेऊन त्या बदल्यात पैशास धर म्हणुन वादातील मिळकत गट नंबर २०९ मधील २० आर ही शेतजमिन गैरअर्जदार सावकार यांच्या नावाने लिहुन दिलेली आहे. जमिनीचे खरेदी खतात जमिनीचा ताबा दिला असे नमुद केले असले तरी प्रत्यक्ष शेतजमिनीचा ताबा गैरअर्जदार यांना दिलेला नाही. या शेतजमिनीवर अर्जदार यांचाच ताबा असून त्या मध्ये ते पिक घेत आहे. या बाबीस वरील नमुद दोन्ही साक्षीदार पुष्ठी देत आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील व्यवहार हा अैवध सावकारीचा असून त्या पैशास धर म्हणुन वादातील मिळकत गैरअर्जदार यांच्या नावाने खरेदीखता द्वारे लिहुन दिली असली तरी सदरचे खरेदीखत हे सावकारी रकमेस गहाण खत म्हणुन लिहुन दिले असल्याचे सकृत दर्शनी सिध्द होत आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

यावरुन असे दिसुन येते की, खरेदी विक्री चा व्यवहार असता तर शेत जमिन अर्जदाराच्या ताब्यात न राहता ती गैरअर्जदाराच्या ताब्यात राहिली असती याठिकाणी पुर्वीपासुन ते आजपर्यंत शेत जमिनीचा ताबा हा अर्जदार यांचे कडे असल्याने व या व्यवहारातील मध्यस्थी साक्षिदार हे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील व्यवहार हा अवैध सावकारी व्यवहार असल्याबाबत पुष्ठी देत आहे तसेच गैरअर्जदार यांच्या विरुध्द अवैध सावकारीबाबत या कार्यालयास आणखी दावा क्र.१०/२०१६,११/२०१६,१२/२०१६ चालु आहे त्यामुळे गैरअर्जदार हे अवैध सावकारी करतात हे त्याच्या विरूध्द चालु असलेल्या अवैध सावकारी प्रकरणावरून सकृत दर्शनी सिध्द होत असुन अर्जदार यांनी त्यांची मौजे लायगांव येथील गट नंबर २०९ मधील २० आर शेतजमिन ही सावकारी व्यवहारात गहाण म्हणुन दिलेली आहे. तसेच गैरअर्जदारांचे विरुध्द यापुर्वी मुळतक्रारदार श्री.जगन्नाथ बाबुराव बोगाने यांचे दिनांक २८/०१/२०१४ रोजीचे सावकारीचे तक्रारी संबंधाने तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था औरंगाबाद यांना चौकशी करुन अहवाल सादर करणे बाबत कळविले नुसार त्यांचे कार्यालयाचे सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी दिनांक ११/४/२०१४ रोजी गैरअर्जदारांचे घरझडती व प्रत्यक्ष शेतजमिनीचे भेटी पंचनाम्यानंतर दिनांक २०/११/२०१४ रोजीचे सादर चौकशी अहवालात गैरअर्जदारांची सावकारी संशय संबंधाने स्पष्ट नमुद आहे.हे वरील बाबीनुसार सिध्द होत असल्याने मुद्दा क्र. ०१ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

मुद्दा क्र.०२ चे उत्तर होकारर्थी दिलेले आहे.गैरअर्जदार यांनी नमुद केलेले आहे की, या प्रकरणी गैरअर्जदार यांच्या राहत्या घराची दिनांक ११/०४/२०१४ रोजी घरझडती घेण्यात आली असुन त्या बाबतचा पंचनामा चौकशी

अधिकारी यांनी केलेले आहे. त्या पंचनाम्यानुसार गैरअर्जदार यांचे घरझडती मध्ये आक्षेपार्ह कागदपत्रे सापडलेली नाही. त्यानुसार ता. उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१४ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला आहे त्यामुळे सदरची तक्रार ही सावकारी कायदया अंतर्गत येत नाही. या गैरअर्जदार यांच्या म्हणन्यास पुष्टी देता येत नाही. कारण अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जावर दोन साक्षीदार नामे श्री. जगन्नाथ बाबुराव बोगाने व श्री .हसन उस्मान पठाण यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहे. त्याच्या म्हणन्यानुसार अर्जदार व गैरअर्जदार सावकार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे यांच्यातील व्यवहार हा अवैध सावकारीचा असून पैशास धर म्हणुन अर्जदार यांनी त्यांची गट नंबर २०९ मधील २० आर शेतजमिन ही गैरअर्जदार यांच्या नावाने सावकारी व्यवहारात खरेदीखता द्वारे लिहुन दिली आहे. ते खरेदीखत नसुन साक्षीदार यांच्या म्हणन्यानुसार गहाण खत असल्या बाबत दिसुन येत आहे. शेतजमिनीचा ताबा अर्जदार यांचाच आहे. गैरअर्जदार यांनी शेतजमिन खरेदी केली असल्यास शेतजमिनीचा ताबा अर्जदार यांच्याकडे ठेवण्याचे प्रयोजन काय या बाबत गैरअर्जदार यांनी कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर व्यवहार हा सावकारी अंतर्गत असल्याने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १७ व १८ नुसार सदर प्रकरण चालविणे योग्य असल्याने मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होय दिलेले आहे.तसेच मुळअर्जदार, प्रस्तुत अर्जदार व इतर तक्रारदार तसेच गैरअर्जदार यांनी या बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचीका क्रमांक ६००/२०१५,९१७/२०१५ व २२२/२०१५ दाखल झालेल्या होत्या सदर याचीका मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १५/०१/२०१६ रोजी आदेश देऊन निकाली काढलेल्या आहे. त्या नुसार या प्राधिकरणास गैरअर्जदार यांच्या विरूध्द सदर प्रकरण चालविण्यास कोणतीही स्थगीती नाही. या आदेशानुसार सदर प्राधिकरण हे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनिमय २०१४ चे कायदयानुसार कार्यावाही करू शकतात व आवश्यकता वाटल्यास गैरअर्जदार यांच्या विरूध्द फौजदारी कार्यवाही करू शकतात मा. उच्च न्यायालय यांनी या आदेशात असेही नमुद केले आहे की, गैरअर्जदार यांच्या विरूध्द कोणतीही कार्यवाही झालेली नाही. ज्या वेळी त्यांच्या विरूध्द कार्यवाही होईल त्या वेळी गैरअर्जदार हे योग्य त्या प्राधिकारणाकडे दाद मागु शकतात असे आदेशात नमुद करून सदरील सर्व याचीका निकाली काढलेल्या आहे. त्यामुळे या प्राधिकरणास निर्णय देण्यास अडचन नाही. त्यामुळे अर्जदार यांची तक्रार अवैध सावकारी अंतर्गत असल्या बाबत सिध्द होत असल्याने व ती तक्रार कायदयास अनुसरून असल्याने व चालविणे योग्य आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) मधील तरतुदी नुसार कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे किंवा कर्जदाराचे अर्जा वरून अन्य रितीने जर ह्या पडताळणीच्या किंवा तपासणीच्या दिनांका पासून अथवा कर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांका पासून १५ वर्षाच्या आत विक्री, गहाण, भाडेपट्टा विनियमन या रुपाने किंवा अन्य रुपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल सावकाराला प्रतिभूती म्हणून दिलेल्या

मालमत्तेच्या स्वरुपाचे आहे. असे जिल्हा निबंधकास सहकारण वाटत असेल तर त्या जिल्हा निबंधकास स्वतः किंवा त्या प्रयोजनासाठी विहित रितीने नियुक्त करण्यांत येईल. अशा चौकशी अधिकाऱ्या मार्फत या व्यवहाराच्या स्वरुपाची आणखी चौकशी करण्यात येईल अशी तरतुद उक्त अधिनियमात करण्यांत आलेली आहे. आणि उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदार यांचे प्रकरणात सुनावणी / चौकशी सुरु करण्यांत आलेली आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी सुनावणीचे वेळी असे प्रतिपादन केले आहे की, सदर प्रकरण हे सावकारी कायदयास अनुसरून नसल्याने ते फेटाळण्यात यावे. या म्हणण्यास पृष्ठी देता येत नाही. म्हणुन मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे

मुद्या क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी असल्याने मुद्या क्र.०३ चे उत्तर होकारार्थी येत असुन अर्जदार यांची मौजे लायगाव येथील गट नं.२०९ मधील अर्जदार यांचे वडील कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने यांनी करुन दिलेले २० आर शेतजमिनीचे खरेदीखत जे गैरअर्जदार सावकार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा. इंदिरा नगर गारखेडा परिसर औरंगाबाद यांच्या नावाने सावकारीच्या ओघात गहाण खत म्हणुन कर्जाऊ रक्कमेस प्रतिभुती म्हणुन गहाण खत म्हणुन लिहुन दिलेली आहे. हे सिध्द होत आहे.

त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेले म्हणने सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले साक्षीपुरावे यांचे अवलोकनाअंती अर्जदार यांचे वडील कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांनी त्यांची वडीलोपार्जित मौजे लायगव ता.जि.औ.बाद येथील गट नंबर २०९ मधील २० आर शेतजमिन गैरअर्जदार सावकार श्रीमती कमलबाई रविंद हिरे यांच्या नावाने रू.१२,०००/- मध्ये ५टक्के व्याजदराने मुद्दल व व्याजाच्या परत फेडीनंतर परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखता द्वारे गैरअर्जदार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा.इंदिरानगर गारखेडा परिसर औ.बाद यांचे नावाने सावकारी व्यवहारात खरेदीखत क्रमांक ९०४/२००१ दिनांक १६.०२.२००१ नुसार अर्जदार वडील कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने यांनी गैरअर्जदार सावकार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे यांना प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली असल्याचे सिध्द झालेले असल्याने सदरचे खरेदीखत रद्द करून ही शेतजमिन मुळहस्तांतरणकार कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांचे कायदेशीर वारस आर्जदार श्री. बाप्पासाहेब शिवाजी बोगाने यांना परत करणे आवश्यक असल्या बाबतची माझी खात्री झालेली असल्याने त्या बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी.एन.व्ही.आघाव, सावकाराचे जिल्हा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांनी त्यांचे नावावर असलेली मौजे लायगाव शिवारातील गट नंबर २०९ मधील २० आर शेतजमिन खरेदी खत क्रमांक ९०४/२००१दिनांक १६/०२/२००१ अन्वये गैरअर्जदार सावकार श्रीमती कमलबाई रविंद्र हिरे रा.इंदिरानगर गारखेडा परिसर औ.बाद

यांचे नावाने सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेली असल्याने सदर शेतजमिनीचे खरेदीखत क्रमांक ९०४/२००१ दिनांक १६/०२/२००१ हे सावकारी अंतर्गत गहाणखत असल्याने ते अवैध असल्याचे घोषीत करून रद्द करण्यात येत आहे. सदर खरेदीखता मधील नमद गट नंबर २०९ मधील २०आर शेतजमिन हस्तांतरणकार मुळ मालक कै. श्री. शिवाजी पिता यशवंत बोगाने यांचे कायदेशीर वारस श्री. बाप्पासाहेब शिवाजी बोगाने रा.लायगाव ता.जि.औ.बाद यांना परत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणी अंतर्गत सदर जमिनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक ३०/०४/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

(एन.व्ही.आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**प्रत :-**

१. मा. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद/खुलताबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२. मा. तहसिलदार,औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
३. तलाठी ,लायगाव सजा पांढरीपिंपळगाव ता.औ.बाद यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. उपनिबंधक,सहकारी संस्था ता. औरंगाबाद यांना माहितीस्तव रवाना

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद